
कोणीतरी सूर्याला खाऊन टाकतंय!





कोणीतरी सूर्याला खाऊन टाकतंय!


रूथ सोनबॉर्न

चित्रे व सजावट: एरिक गरनी

अनुवाद: सुजाता गोडबोले



एक दिवस कोंबडी दाणे टिपत होती
आणि अचानक अंधार पडू लागला.



कोंबडी म्हणाली, “नवलच आहे. आकाशात एकही ढग नाही.
पण तरीही कसा अंधार पडतोय?”



तिने आकाशाकडे पाहिले तर तिला आणखीच आश्चर्य वाटले.
कोणीतरी एक घास घेतल्यासारखा सूर्याचा एक भाग नाहीसा झाला होता.
“अरे बापरे!” कोंबडी घाबरून ओरडली. “कोणीतरी सूर्याचा एक तुकडा खाल्ला आहे! आता हे कोंबड्याला सांगायलाच हवे.”




आणि पंख फडफडत,

पिसे उडवत

कोंबडी निघाली.

कोंबडा कुंपणावर उभा राहून जोरजोरात ओरडत होता.
त्याला हाक मारून कोंबडी म्हणाली, “कोंबड्या, कोंबड्या, काहीतरी भयंकर होते आहे.”
कोंबडा म्हणाला, “मला उगीच त्रास देऊ नकोस. मी रियाज करतो आहे, दिसत नाही का? येणाऱ्या जाणाऱ्या सगळ्यांशी मी गप्पा मारत बसलो, तर उद्याच्या सूर्योदयापर्यंत माझी तयारी कशी होईल?”






“तुझा रियाज अगोदर थांबव पाहू,” कोंबडी म्हणाली. “उद्या मुळी सूर्योदय होणारच नाही आहे. जरा तिकडे वर तर बघ.”

“कुकूच कू... , अरे हे सूर्याला काय झाले?” कोंबडा घाबरून म्हणाला.

“कोणीतरी त्याला खाऊन टाकतंय. चल, आपण बदकाला सांगूया.” कोंबडी म्हणाली.




आपले पंख फडफडत,

पिसे उडवत ते दोघेही निघाले.

बदक आपल्या तळ्यात पोहत होते.
“बदका, बदका, अरे काहीतरी भयंकर घडतंय!” कोंबडी म्हणाली.
“आता मला उगीच त्रास देऊ नकोस. मी छान पोहतोय, दिसत नाही का?
इतक्या उकाड्यात थंड रहायचा हा एकच तर मार्ग आहे.”
“हो. पण आता तुला थंड राहण्याची चिंताच करायला नको. कारण आता मुळी
हवा गरम होणारच नाहीये, तिकडे आकाशात बघ जरा.” कोंबडी म्हणाली.






“क्वॅक… क्वॅक! सूर्याला काय होतंय?” बदक घाबरून क्वॅक क्वॅक करू लागले.

“त्याला कोणीतरी खाऊन टाकतंय! चल, आपण डुकराला सांगूया.” कोंबडी म्हणाली.



मग ते सगळे पंख फडफडत,
पिसे उडवत घाईघाईने निघाले.



डुक्कर आरामात चिखलात लोळत होते.

“डुकरा, डुकरा, काहीतरी भयंकर घडते आहे!” कोंबडी म्हणाली.


“आता मला कुठलीच वाईट बातमी देऊ नकोस हं, मी माझं डोकं शांत ठेवायचा प्रयत्न करतो आहे, दिसत नाही का? इतकं उन्ह असताना चिखलात लोळण्याइतकं काहीच सुखाचं नाही.” डुक्कर म्हणाले.



“आता चिखलात लोळणं थांबव,” कोंबडी म्हणाली. “उन्हाचा चटका आता नाहीच आहे. आकाशाकडे बघ जरा.”

“ई... ई ...” डुक्कर किंचाळले, “सूर्याला काय होतंय?”

“कोणीतरी त्याला खाऊन टाकतंय! चला, आपण बोकडाला सांगूया.” कोंबडी म्हणाली.





पंख फडफडत,
पिसे उडवत,
पाय आपटत ते सगळे निघाले.



बोकड डोंगरावर आरामात गवत खात होता.

“बोकडा, बोकडा,” कोंबडी म्हणाली, “कोणीतरी सूर्याला खाऊन टाकते आहे!”

“मला काय करायचंय! माझं गवत कोणी खात नसलं म्हणजे झालं.
हे सगळ्यात लुसलुशीत गवत आहे!” बोकड म्हणाले.

“म्हणजे सूर्य नसला तरी तुला चालेल का?” डुकराने विचारले.

“सूर्य नाही? असा वेडेपणा मी कधीच ऐकला नाही.” बोकड म्हणाले.

“आता तूच पहा!” कोंबडी म्हणाली.



“बें... बें...” बोकड ओरडू लागला. “बापरे... सूर्य अर्धाच राहिलाय!
मी अशी भयंकर गोष्ट कधीच पहिली नव्हती. बें... बें...!”

बोकडाने बें... बें... असे ओरडणे सुरु केल्याबरोबर डुक्करही रेकू लागले, बदकाने क्वॅक क्वॅक करायला सुरुवात केली, कोंबडा कुकूच...कू करू लागला आणि कोंबडीनेही क्लक क्लक करून आपला आवाज त्यात मिसळला.

“आता काय करायचं? आता काय होणार?” सगळे एकदमच ओरडू लागले.





“तुम्ही सगळे गप्प बसायला काय घ्याल? मुकाट्याने ग्रहण पहा बरे.” जवळून कोणाचा तरी आवाज आला.





सर्वांनी आवाजाच्या दिशेने मान वळवली.

वरून कासव त्यांच्याकडे पाहत होते.


“तुम्हाला ग्रहण नक्कीच चुकवायचे नसेल,” कासव म्हणाले.

“तुम्हाला माहित आहे ना, ते काही नेहमी होत नाही. खूप खूप दिवसांनी कधीतरी चंद्र आपल्या आणि सूर्याच्या मध्ये येतो. आणि आता तेच घडत आहे, कळलं का?”

सगळे प्राणी आश्चर्याने कासवाकडे पाहू लागले.



मग सगळेच आकाशाकडे पाहू लागले.
सूर्याचा एक लहानसा तुकडा दिसत होता.



ते आकाशाकडे पहात असताना अंधार वाढू लागला. सूर्याचा आकार आणखी
आणखी लहान होऊ लागला आणि बघता बघता तो दिसेनासा झाला.



सूर्याच्या समोर चंद्राचा आकार दिसू लागला. चंद्र आता सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये आला होता. आजूबाजूला शेतात सगळीकडे अंधार झाला होता आणि निरव शांतता पसरली होती. ते आता चंद्राच्या सावलीत उभे होते.



आता सूर्य कायमचा नाहीसा झाला असावा असा विचार त्यांच्या मनात येतो न येतो तोच सूर्याचा एक लहानसा तुकडा परत दिसू लागला. पाहता पाहता तो तुकडा हळू हळू मोठा होऊ लागला. आकाशात परत उजेड पसरू लागला. चंद्र पुढे निघून चालला होता. सूर्य मात्र होता तिथेच होता.



“सूर्याचा विजय असो!” बोकड, डुक्कर, कोंबडा आणि बदक सगळे आनंदाने उड्या मारत ओरडू लागले. “आपल्या लाडक्या, सुंदर, मोठ्या सूर्याचा विजय असो!”



“बरं झालं! त्याला कोणी खाऊन टाकलं नाही ते!” कोंबडी म्हणाली.

मग सगळे आपापल्या कामाला परत गेले.

बोकड परत गवत खाऊ लागला.



बदक आपल्या तळ्यात पोहायला गेले.




डुक्कर परत चिखलात लोळायला गेले.



कोंबडा कुंपणावर बसून परत गाऊ लागला.





कोंबडी आपल्या अंगणात जाऊन पंख झाडत परत दाणे टिपू लागली.

समाप्त